# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ
## विद्यापीठ विद्यार्थी कल्याण विभाग

**RTMNU/DSW/435** **Date- 30/1/2016**

प्रति,

प्राचार्य /प्राचार्या/विभागप्रमुख,
सर्व संलग्नीत/संचालीत महाविद्यालये व पदव्युत्तर विभाग
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर.

विषय : आंतर महाविद्यालयीन सांस्कृतिक विद्यापीठ युवा महोत्सव 'युवारंग २०१५– १६' दिनांक २५ ते २७ फेब्रुवारी, २०१६.

मा. महोदय /महोदया,

विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण विभागातर्फे यावर्षी आंतर महाविद्यालयीन युवक महोत्सव 'युवारंग २०१५–१६' चे आयोजन २५ ते २७ फेब्रुवारी, २०१६ या दरम्यान आयोजित करण्यात येत आहे. या महोत्सवात संगीत, नृत्य, नाटक, साहित्य व ललित कला विषयामध्ये निरनिराळया स्पर्धा होणार आहेत.

आपणांस विनंती आहे की आपण आपल्या महाविद्यालय/विभागातून या स्पर्धासाठी विद्यार्थी व विद्यार्थिनीची निवड करून सोबत जोडलेल्या आवेदन प्रपत्रात त्याचे नावे Proforma– D मध्ये २३ फेब्रुवारी, २०१६ पर्यंत संचालक, विद्यार्थी कल्याण विभाग, श्रीमंत पुर्णचंद्रराव बुटी सभागृह, विद्यापीठ ग्रंथालय परिसर, रामदासपेठ, नागपूर ४४००१० या पत्यावर पाठवावे.

या महोत्सवात सहभागी होण्यासाठी विद्यापीठ विद्यार्थ्यांना TA – DA देण्यात येणार नाही. फक्त दुपारच्या भोजनाची व्यवस्था विद्यापीठाद्वारे करण्यात येईल.

सर्व स्पर्धा श्रीमंत पूर्णचंद्र बुटी सभागृह, रामदासपेठ येथे होतील. याची नोंद घ्यावी.

**प्रमुख अटी :–**

१. फक्त वरिष्ठ महाविद्यालयाचेच विद्यार्थी सहभागी राहतील.
२. विद्यार्थ्यांचे वय ०१ जुलै, २०१५ ला २५ वर्षाचे आतील असावेत.
३. महाविद्यालयाचा एकच विद्यार्थी किंवा चमू एका स्पर्धेत सहभागी होवू शकेल.
४. विद्यार्थ्यांनी आपले ओळखपत्र व महाविद्यालयाचे पत्र सोबत आणावे.
५. निर्णायकांचा निर्णय हा अंतिम राहिल.
६. विद्यार्थ्यांना शिस्त पाळावी लागेल अन्यथा त्यांचा सहभाग रद्द समजण्यात येईल.
७. सर्व अधिकार आयोजकांच्या स्वाधीन राहतील.
८. विद्यार्थ्यांनी स्पर्धेच्या अर्धा तास आधी हजर असणे आवश्यक राहील.

कृपया आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना हया स्पर्धामध्ये सहभागी होण्यासाठी हे परिपत्रक त्यांच्या निदर्शनास आणून द्यावे. स्पर्धेचे विषय व नियमावली सोबत जोडली आहे.

आपले सहकार्य या पूर्वीही मिळाले व ते पूढेही अपेक्षित आहे.

सहपत्र :

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. | Proforma | - | A | (स्पर्धेचे वेळापत्रक) |
| २. | Proforma | - | B | (विविध स्पर्धा व इतर माहिती) |
| ३. | Proforma | - | C | (स्पर्धेची नियमावली) |
| ४. | Proforma | - | D | (स्पर्धेचे प्रवेश पत्र) |

( डॉ. निहाल आर. शेख)
संचालक
विद्यार्थी कल्याण विभाग